This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No. / अनुक्रमांक [ | | | | | | | | | | | | ]

Code No. 44/S/A/M
कोड नं.

# मराठी
# MARATHI
# (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators
(निरीक्षकाची सही)
1. ____________________
2. ____________________

सामान्य अनुदेश :

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठांवर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपा करुन प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठांवर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परिक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **44/S/A/M** लिहावीत.

# MARATHI

## (मराठी)

## (204)

वेळ : तीन तास | एकूण गुण : **100**

**निर्देश :**

**1** सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**2** सर्व प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहावीत.

**3** प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

**1** झेल्याच्या खिशांत काय होते ? **1**

(A) चिंचा (B) कैऱ्या

(C) आवळे (D) बोरे

**2** पुढे दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा. **1**

(A) भाशावृद्धी (B) भाषावॄद्धी

(C) भाषावृद्धी (D) भाषावृद्धी

**3** खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा. **1**

'करी दिव्य ............ घेऊ'

(A) पताका (B) झेंडा

(C) माला (D) त्तोरण

**4** पुढील कुठल्या वाक्यांत सर्वनाम आले आहे ? **1**

(A) माधव घरी गेला (B) सुधा परवा येईल

(C) सुगंधा टेनिस खेळते (D) ती चांगली खेळते

5 देशांत सगळ्यांत मोठे धन कोणते ? 1

(A) पैसा (B) शस्त्रात्र

(C) मुले (D) प्रदेश

6 नागू धाडसाची कामे करु शकत नव्हता, कारण ......... 1

(A) धाडसाची कामे आता त्याला जमण्यासारखी नव्हती.

(B) बायको त्याला झोपेतून उठवत नसे.

(C) अति झोपेमुळे त्याला वेळ मिळत नसे.

(D) त्याचा दूधाचा धंदा वाढला होता.

7 तळयांतील बदके कशी होती ? 1

(A) पांढरी शुभ्र (B) आनंदी

(C) छोटी छोटी (D) सुरेख

8 योग्य पर्याय घालून वाक्य पूर्ण करा – 1

'ने मजसी ने परत .......... !'.

(A) मातृभूमीला (B) प्रासादाला

(C) मद्‌गृहाला (D) गावाला

9 जगावेगळी गोण्ट माणूस कां करीत नाही ? 1

(A) लाज वाटते म्हणून

(B) लोक नावे ठेवतील म्हणून

(C) भीती वाटते म्हणून

(D) लोक मूर्ख म्हणतील म्हणून

10 शेतकरी शेतसारा कां देत नाही ? 1

(A) शेतसारा माफ होणार होता.

(B) कारण त्याला शेतसारा बुडवायचां होता.

(C) शेतसारा देण्याची इच्छा नव्हती.

(D) शेतसारा देण्यासाठी पैसे नव्हते.

11 कापणीला सुखात करण्यापूर्वी शेतकरी कुणाची पूजा करतात ? 1

(A) ठेकळांची

(B) कोयत्याची

(C) देवीची

(D) वडाची

12 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. 1

'अखंड सावधान असावे । ................ कदापि नसावे ।।'

13 महर्षी कर्वे यांच्या कोणत्या कार्याला लेखक चमत्कार म्हणतो ? 1

14 डोंबारी स्त्रियांची तुलना लेखकाने इतिहासातील कोणत्या स्त्री बरोबर केली आहे ? 1

15 नामस्मरणाने भक्त प्रल्हादाला काय मिळाले ? 1

16 खालील वाक्यांतील क्रियापद ओळखा व त्यांचा काळ कोणता आहे ते सांगा. 1

(i) राम वडिलांना मदत करीत होता.

(ii) उद्या पाऊस येईल.

17 'आपला बाप अंधार वाहून वाहून पोक्या झाला' पोक्या झाला म्हणजे काय ? 1

18 झेल्याला आपला हिशोब चुकला असे कां वाटले ? 1

19 'बलसागर भारत होवो' या कवितेत कवीने सहाय्याला या असे आवाहन कोणाला केले ? 1

20 पुढे दिलेल्या शब्द समुहाबदल एक शब्द सूचवा. 1

(i) अजिबात शत्रू नसलेला

(ii) सत्याचा आग्रह धरणारा

21 ‘पाऊल चिन्हे’ या कवितेत मुक्त प्रवासी कुणाला म्हटले आहे ? 1

22 खाऊचा पुडा केशवने कचरा कुंडीत कां टाकून दिला ? 1

23 (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन दोन समानार्थी शब्द लिहा :– 2

(i) नमस्कार

(ii) जमीन

(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :– 2

(i) अनुकूल

(ii) स्वतंत्र

(iii) कळस

(iv) हिंसा

24 पुढील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :–

‘मराठी भाषा मरणोन्मुख झालेली आहे असे कुणीच म्हणणार नाही. शास्त्रीय वाङ्मयाचा व्यायाम घेण्याचा तिला कंटाळा आहे. प्रेमाची खमंग फोडणी दिलेले पदार्थच तिला फार आवडतात. तिची वेशभूषा अगदी आजच्या घटकेला शोभणारी असली, तरी मन मात्र अजून मागच्या काळांत रेंगाळत आहे; इत्यादी आक्षेपांत थोडासा तथ्यांश असला तरी तिच्या या तक्रारी काही कायम टिकणाऱ्या नाहीत. ललित लेखकांनी आपल्या आवडीच्या शास्माविषयी वाङ्मय निर्माण करण्याचे ठरविले तर ते काय त्यांना अशक्य आहे ?

‘गरज तसा पुरवठा’ हे तत्व मला वाङ्मयतही मान्य आहे; पण ते पाळतानां लेखकाने व्यापारी होऊ नये. डॉक्टर व्हावे. रोग्याच्या शरीराला ज्या ज्या द्रव्याची जरुरी असते ती ती औषधाच्या द्वारे त्याला देणे हेच डॉक्टरांचे कर्तव्य नव्हे काय ? शिवाय गरज तसा पुरवठा या तत्वाइ केच ‘गरज ही कल्पकतेची आई’ हे तत्वही प्रसिद्ध आहे. म्हणजे पुरवठा व कल्पकता यांचे बहिण–भावंडाचे नाते होते. हे नाते पाळण्याची दक्षता लेखकांनी ध्यायला नको का ?

**प्रश्न :**

(i) मराठी भाषे विषयी कोणते आक्षेप घेतले जातात ? 1

(ii) कोणत्या दोन तत्वांचा उल्लेख उताण्यांत केला आहे ? 1

(iii) ललित लेखकांकडून खांडेकरांनी कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे ? 1

(iv) ललित लेखकांनी कोणती दक्षता ध्यावी असे खांडेकरानां वाटते ? 1

25 खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :–

''आता विखात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ॥
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥ 1 ॥
जे खकांचि व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीरती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥ 2 ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥ 3 ॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची यांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतुं भूतां ॥ 4 ॥''

**प्रश्न :**

(i) ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मके' हे विशेषण का व कोणासाठी वापरले आहे ? **1**

(ii) 'पसायदान' म्हणजे काय ? **1**

(iii) कवीने दुष्ट लोकांसाठी कोणती इच्छा व्यक्त केली आहे ? **1**

(iv) प्राणिमात्रानां काय लाभावे असे कवी म्हणतात ? **1**

26 (अ) 'घरोघरी मातीच्या चुली' या म्हणीचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. **2**

(ब) डॉ. हेडगेवार यांनी कोणत्या संघटनेची स्थापना केली ? व कां ? **2**

27 (अ) पूर्वीच्या व आजच्या सुशिक्षितांना टिळक दोष कां देतात ? **3**

(ब) 'कन्याकुमारी' या पाठाचे लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या मनामध्ये निर्माण झालेली एकटेपणाची भावना नाहीशी कशी झाली ? **3**

28 (अ) आपल्या झोपेच्या सवयीबदल नागूस कां वाईट बाटे ? **2**

(ब) बदकाच्या उदाहरणांतून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले आहे ? **2**

29 (अ) ''बलकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलाचि कि एकमते ।''
वरील पद्यांशाचे ससंदर्भ स्पष्टीकरण करा. 3

(ब) कंदील फुटून जखम झाल्यावरही टिळक कसे वागले ? धड्याचे व लेखकाचे नाव लिहा. 3

30 (अ) 'श्री' ने लेखकाकडे पाठ फिरवूनही तिच्या दर्शनाने तो आनंदित कां झाला ? 3

(ब) पिंपळ पानावर अवघे विश्व तरुन जाईल असे कवीला कां वाटते ? 3

31 (अ) 'वीर पत्नी आपल्या पतीला रणांगणावर कसे जाण्यास सांगते ? कवयित्रीचे व कवितेचे नांव लिहा. 3

(ब) मास्तरांचा निरोप घेतांना झेल्याची मनःस्थिती कशी झाली होती ? 3

32 तुमच्या गावांतील सर्कस पाहून तुमची भावंडे घरी आली आहेत. त्यांचा तुमच्याशी झालेला संवाद 8 ते 10 वाक्यांत लिहा. 4

33 खालीलपैकी **एका** विषयावर निबंध लिहा : (शब्द मर्यादा 200) 10

(i) आमचे शेजारी

(ii) मी पाहिलेला एक दिवसीय क्रिकेट सामना

(iii) मोबाईल फोन चे फायदे तोटे

(iv) वाढती लोकसंख्या – एक समस्या

34 तुम्हाला या पाठ्यपुस्तकातील सर्वांत अधिक कोणता पाठ आवडला ? कां ? पाठाचे व लेखकाचे नाव लिहा. 4

**35** तुमचा मित्र जिल्हा पातळीवरील धावण्याच्या स्पर्धेत पहिला आल्याबद्यल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. **8**

**किंवा**

व्यवस्थापक, ज्ञानप्रकाश सेवा मंडळ, निफाड, जि. नाशिक – 422003 यांचे कडे 'ऑफीस असिस्टंट' या पदावर नोकरी करण्यासाठी अर्ज करा. **8**

**36** पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा :– **4**

वृक्षलागवडीचे महत्व आता सर्वांना कळले आहे; पण तितकेसे बळलेले मात्र नाहीं, झाडे लावतानाचे फोटो वृत्तपत्रांतून झळकतात. ती झाडे पुढे जगतात का ? पण याची कोणी चिंता करत नाही. फोटो साठी, प्रसिद्धीसाठी झाडे लावण्याचा 'शो' संपला पाहिजे. गेल्या वीस–पंचवीस वर्षापासून 'झोड लावा' ही घोषणा दुमदुमते आहे. ती सर्व झाडे जगली असती तर महाराष्ट्राचे 'दंडकारण्य' झाले असते ! म्हणूनच केवळ झाडे लावा हयाि

घोषणेस 'झाडे जगवा' ही जोड घावी लागली. तशी सुबुद्धी सर्वांना होवो ही माझ्यासारख्या वन मित्रांची अपेक्षा !

**37** रत्नाकर मेश्राम यांच्या घरांतील एकूण उत्पन्नापैकी 35% उत्पन्न तेल गिरणीतून, 25% उत्पन्न दुकानदारीतून, 25% उत्पन्न शेतीव्यवसायांतून व 15% उत्पन्न दुधाच्या व्यवसायातून मिळते. हे वर्तुळालेखाच्या साहाय्याने दाखवा. **4**